# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

५८३/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -४११०३७

Email: - bdbranch.ho@mswc.in

**Website: mswarehousing.com**


## सांगोला येथील शितगृह सुविधा भाडे तत्वावर देणेबाबतची

## ई-निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, सांगोला, जि. सोलापूर, येथे सांगोला पासून फक्त ३ किलो मीटर अंतरावरील शितगृह एकूण ८४० मे. टन (प्रत्येकी २८० मे.टनाचे तीन चेंबर्स) लॉक ॲण्ड की तत्वावर शेतकरी, व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपनी, आयातदार-निर्यातदार इत्यादी सक्षम निविदाकारास ३६ महिने कालावधीसाठी भाड्याने देण्याचा मानस आहे.

| कामाचा प्रकार व तपशील | E-Tender Notice No | वखार केंद्र | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| सांगोला येथील शितगृह सुविधा भाडे तत्वावर देणेबाबतची | MSWC/BD & QC/SANGOLA/ L&K/04/2023 | सांगोला | २४,०००/- |

निविदा दस्तावेज आणि निविदेची सविस्तर तपशील अटी व शर्तींसह निविदा फॉर्म करीता महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या (Organisation Chain – Co-operation, Marketing and Textiles Dept, Mumbai) व महामंडळाचे www.mswarehousing,com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. प्रत्यक्ष अथवा पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाही. (निविदा विक्रीचा कालावधी दि.१०/०३/२०२३ ते २०/०३/२०२३ दुपारी ३.०० पर्यंत) ऑनलाईन निविदा जमा करण्याची अंतिम तारीख २०/०३/२०२३ दुपारी ३.०० पर्यंत व निविदा दि. २१/०३/२०२३ दुपारी ३.३० नंतर उघडण्यात येईल.)

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

583/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -411 03

Email: - bdbranch.ho@mswc.in

**Website: mswarehousing.com**


# सांगोला येथील शितगृह सुविधा भाडे तत्वावर देणेबाबतची ई-निविदा सुचना

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, कृषि उत्पन्न बाजार समिती आवार, सांगोला, जि. सोलापूर येथे रेल्वे मालधक्यापासून फक्त ३ किलो मीटर अंतरावरील शितगृह एकूण ८४० मे. टन (प्रत्येकी २८० मे.टनाचे तीन चेंबर्स) लॉक ॲण्ड की तत्वावर शेतकरी, व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपनी, आयातदार-निर्यातदार इत्यादी सक्षम निविदाकारास ३६ महिने कालावधीसाठी भाड्याने देण्याचा मानस आहे.

इच्छुक निविदाकार जे आधीच शितगृह व अनुषंगिक व्यवसायात आहेत त्यांनी दिनांक 10.03.2023 ते 20.03.2023 पर्यंत महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांच्याकडे ई-निविदा ऑनलाईनद्वारे सादर करू शकतात.

*** ई- निविदा कार्यक्रम ***

| | | |
|---|---|---|
| 1 | जाहिरात कालावधी | 10.03.2023 ते 20.03.2023 |
| 2 | अर्ज सादर करावयाचा शेवटचा दिनांक | 20.03.2023 दुपारी 3:00 वाजता फक्त ऑनलाईनद्वारे |
| 3 | अर्ज उघडण्याचा दिनांक | 21.03.2023 दुपारी 3.30 वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. |
| 4 | अर्जासोबत सादर करावयाची फी रू. | Rs. 6,000/- + GST through the online e – payment gateway. |
| 5 | बयाणा रक्कम रू. | Rs. 24,000/- through the online e – payment gateway. |

| कामाचा प्रकार व तपशील | E-Tender Notice No | वखार केंद्र | बयाणा रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| सांगोला येथील शितगृह सुविधा भाडे तत्वावर देणेबाबतची | MSWC/BD & QC/SANGOLA/ L&K/04/2023 | सांगोला | २४,०००/- |

निविदा दस्तावेज आणि निविदेची सविस्तर तपशील अटी व शर्तीसह निविदा फॉर्म करीता महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या (Organisation Chain – Co-operation, Marketing and Textiles Dept, Mumbai) व महामंडळाचे www.mswarehousing.com या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. प्रत्यक्ष अथवा पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाही. दस्तावेज योग्य प्रकारे अचुक वाचनीय स्वरुपात, स्पष्टपणे स्कॅन करुन प्रत्येक पानावर निविदाकारांने स्वाक्षरी करुन अपलोड करावे. निविदाकारांने स्वतःला किंवा आपल्या फर्मला महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करुन घ्यावे.

कोणतेही कारण न देता सदरच्या निविदा रद्द करण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)

583/ब, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे -411037

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ हा शासनाचा सार्वजनिक उपक्रम आहे. महामंडळाने राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत सांगोला येथील गोदाम क्रमांक 1 चे रूपांतरण शितगृहामध्ये निर्माण केले आहे. सदर शितगृहामध्ये प्रत्येकी 280 मे.टन साठवणूक क्षमतेचे $4^0$C ते $18^0$C तापमानचे 3 चेंबर्स निर्माण करण्यात आले आहेत. त्यापैकी 3 चेंबर्स (एकूण 840 मे.टन साठवणूक क्षमता) लॉक ॲण्ड की तत्वावर 36 महिन्यांसाठी शेतकरी, व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपनी, आयातदार-निर्यातदार इत्यादी सक्षम निविदाकारास भाड्याने देणेबाबत इच्छुकांकडून ई-निविदेद्वारे अर्ज दिनांक 20.03.2023 पर्यंत मागविण्यात येत आहेत.

*** ई- निविदा कार्यक्रम ***

| | | |
|---|---|---|
| 1 | जाहिरात कालावधी | 10.03.2023 ते 20.03.2023 |
| 2 | अर्ज सादर करावयाचा शेवटचा दिनांक | 20.03.2023 दुपारी 3:00 वाजता फक्त ऑनलाईनद्वारे |
| 3 | अर्ज उघडण्याचा दिनांक | 21.03.2023 दुपारी 3.30 वाजता किंवा स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल. |
| 4 | अर्जासोबत सादर करावयाची फी रू. | Rs. 6,000/- + GST through the online e – payment gateway. |
| 5 | बयाणा रक्कम रू. | Rs. 24,000/- through the online e – payment gateway. |

❖ सांगोला येथील शितगृह सुविधेच्या पाहणी करण्यासाठी इच्छुक निविदाकार केंद्रप्रमुख, मरावम, सांगोला वखार केंद्र (भ्रमणध्वनी क्रमांक- 9421619421 व विभागीय व्यवस्थापक, मरावम, पुणे विभाग, पुणे (भ्रमणध्वनी क्रमांक - 9158001476 यांचेकडे संपर्क साधू शकतात.

**अटी व शर्ती :**

१. यशस्वी निविदाकार यांची निविदा प्राप्त झाल्यानंतर त्याची छाननी व दरांची तुलना केल्यानंतर तांत्रिक अटी व शर्ती आणि उच्चतम दर प्राप्त निविदाकाराची निविदा मान्य करण्यात येईल.

२. अ) निविदाकाराने एकूण तीनही चेंबर्स करीता दर नमूद करणे आवश्यक आहे. तीनपेक्षा कमी चेंबर्स करीता दर नमूद केल्यास निविदा स्विकारली जाणार नाही. महत्तम प्राप्त होणाऱ्या दराच्या निविदा विचारात घेतल्या जातील.
ब) निविदाकारने निविदेचे दर भरताना सदर ई-निविदेबाबत जोडलेल्या Price Schedule ( BOQ Format) मधेच भरून ऑनलाईन सादर करणे अनिवार्य आहे.

३. प्रत्यक्ष ताबा दिल्याच्या दिनांकापासून पुढील 36 महिने कालावधीकरीता सांगोला येथील शितगृहामधील एकूण 3 चेंबर्स लॉक ॲण्ड की तत्वावर भाड्याने देण्याचा निर्णय घेण्यात येतील.

४. यशस्वी निविदाकार यांच्या आरक्षण/ भाडे कालावधी संपुष्टात आल्यानंतर, त्यांचा मूळ कालावधीतील व्यवसाय संबंधांचा आढावा घेवून 6 + 6 महिने मुदतवाढ देणेबाबत अंतिम निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे यांचा राहील.

५. आरक्षण/भाडे कालावधी 36 महिने असून त्यामधील 12 महिने लॉक इन कालावधी असणार आहे. लॉक इन कालावधी मध्ये आरक्षण रद्द करता येणार नाही. तसेच दरवर्षी 6 % प्रमाणे भाडेवाढ देणे बंधनकारक राहील .

६. आरक्षण रद्द करणेसाठी लॉक इन कालावधीनंतर किमान 90 दिवसांची पूर्व नोटीस देणे बंधनकारक राहील.

७. सांगोला येथील शितगृहामधील चेंबर लॉक ॲण्ड की दिल्यानंतर यशस्वी निविदाकाराने तेथे $4^0$C ते 18 $^0$C या तापमाना मध्ये साठवणूक योग्य फक्त कृषी उत्पादने प्राधान्याने साठवणूक करणे बंधनकारक राहील. (उदा. फळे, भाजीपाला, कडधान्ये, मिरची, सुकामेवा, इत्यादी)

८. सांगोला येथील शितगृहामधील चेंबर लॉक ॲण्ड की दिल्यानंतर यशस्वी निविदाकाराने प्रत्येक महिन्याचे गोदाम भाडे व GST रक्कम अग्रीम स्वरूपात (महिन्याच्या पहिल्या सप्ताहामध्ये) RTGS/NEFT द्वारे महामंडळाच्या खात्यावर जमा करणे बंधनकारक राहील. विलंबाने भाडे जमा केल्यास प्रत्येक 30 दिवसांपर्यंत (प्रति मासिक) 2% प्रमाणे विलंब दंड आकारणी करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाराकाराने साठवणुकीतील मालाचा विमा उतरविणे व त्याची प्रत महामंडळास सादर करणे बंधनकारक राहील. इमारत व मशिनरी यांचा विमा महामंडळाकडून उतरविण्यात येईल.

१०. साठवणूकीतील मालाचा विमा न उतरवल्यास भाडे करार रद्द करण्याचा अधिकार महामंडळाकडे राखून ठेवण्यात आले आहे. तसेच साठवणूकीतील मालाचे नुकसान झाल्यास व त्याचा विमा नसल्यास त्या नुकसानी पोटी महामंडळाकडून कोणतीही नुकसान भरपाई देण्यात येणार नाही.

११. सदर लॉक ॲण्ड की तत्वाच्या आरक्षणापोटी/भाडे तत्वापोटी निविदाकाराने सादर केलेल्या दराप्रमाणे सहा महिन्याचे भाडे एवढी समतुल्य रक्कम विना व्याज सुरक्षा ठेव रकमेपोटी सांगोला वखार केंद्रावर जमा करणे बंधनकारक राहील. सुरक्षा तारण ठेव रक्कम जमा केल्यानंतरच चेंबर्सचा ताबा देण्यात येईल.

१२. सुरक्षा तारण ठेव रक्कम कार्यादेश पत्राच्या दिनांकापासून ७ दिवसांत जमा न केल्यास, निविदा रद्द करण्यात येवून, बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

१३. लॉक ॲण्ड की तत्वावर दिलेल्या चेंबरचा ताबा कार्यदेशाच्या दिनांकापासून ७ दिवसात न घेतल्यास सदरची निविदा रद्द ठरवण्यात येऊन बयाना रक्कम जप्त करण्याची कारवाई करण्यात येईल.

१४. शितगृहामधील चेंबरमध्ये थंड वातावरणातील हाताळणी (उतराई-चढाई इत्यादी) याची जबाबदारी यशस्वी निविदाकार यांची राहील. तसेच हाताळणीचे पर्यवेक्षण यशस्वी निविदाकार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांच्या निगरानी खाली करण्यात येईल त्याची जबाबदारी महामंडळाची राहणार नाही.

१५. शितगृहाच्या चेंबरमध्ये साठवणूकीसाठी आवश्यक साहित्य (डनेज, क्रेट, पॅलेट इत्यादी) यशस्वी निविदाकारास स्वखर्चाने करणे आवश्यक राहील. सदर साहित्य अथवा त्यापोटी येणार खर्च महामंडळाकडून उपलब्ध करुन देण्यात येणार नाही.

१६. शितगृहाचा मशिनरी ऑपरेट करण्याची जबाबदारी निविदाकाराकडे राहील. तसेच त्यापोटी येणारे विज देयक अदा करण्याची जबाबदारी निविदाकाराकडे राहील.

१७. निविदाकाराकडे GST अथवा PAN अथवा दोनही उपलब्ध नसल्यास कार्यादेश पत्राच्या दिनांकापासून ७ दिवसात GST अथवा PAN अथवा दोनही सादर करणे बंधनकारक राहील तसे न केल्यास अट क्र. २२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

१८. सदर आरक्षित जागेतील साठवणूकी मुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे यशस्वी निविदाकार यांना तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही. तसेच त्या सबबी खाली भाडे नाकारता / थकविता येणार नाही.

१९. सदर आरक्षित जागेत नाशवंत शेतमाल साठवणूकी मुळे सांगोला वखार केंद्रावर निर्माण होणा ऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी यशस्वी निविदाकार यांची राहिल . तसेच वखार केंद्र परिसरात घाण होणार नाही याची यशस्वी निविदाकार यांनी काळजी घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी.

२०. यशस्वी निविदाकार यांनी महामंडळाशी विहित नमुन्यात आरक्षण/भाडे कालावधीचा साठवणूक करारनामा नोंदणी करणे बंधनकारक राहील.

२१. करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक बाबींचा सर्व खर्च यशस्वी निविदाकार यांना करावा लागेल.

२२. अर्जदार निविदाकाराने ई-निविदेद्वारे सादर केलेली माहिती खोटी अथवा दिशाभूल करणारी आढळून आल्यास सदर निविदाकाराने महामंडळाकडे जमा केलेली बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच सदर निविदाकारास पुढील 3 वर्षे कालावधीसाठी महामंडळाकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येईल.

२३. सांगोला शितगृहामधील चेंबर्स लॉक ॲण्ड की तत्वावर भाड्याने घेणेसाठीचा अर्ज/ई-निविदा शासनाचे निविदा संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर फक्त ऑनलाईनद्वारे सादर करता येईल. ई-निविदा सादर करण्याची सविस्तर माहिती व पद्धत सोबतच्या स्वतंत्रपणे जोडली आहे.

**-सही/-**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**

\\Hoaio-pc-48\e\Ashish\office work\Sangola Cold Storage\SangolaTenderDocument Retender.docx

**अर्जाचा नमुना :**

**विनंती अर्ज**

1. अर्जदार निविदाकाराचे नाव :
2. कार्यालयाचा पत्ता :
3. जीएसटी क्रमांक :
4. पॅन क्रमांक :
5. ई-मेल :
6. फोन नंबर :
7. संपर्कासाठीच्या व्यक्तीचे नाव व मोबाईल नंबर :
8. इतर माहिती :

**अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :**

1. मुंबई प्रांतिक दुकाने व आस्थापना परवानाची छायांकीत प्रत
2. कंपनी नोंदणी प्रमाणपत्र
3. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र
4. पॅन नोंदणी प्रमाणपत्र
5. निविदाकारास कोणत्याही शासकीय / निमशासकीय आस्थापनेकडून काळ्या यादीमध्ये समाविष्ट केलेले नाही याबाबतचे लेटरहेडवर स्वयंघोषणापत्र (रू. 500 च्या स्टॅम्प पेपर वर सादर करण्यात यावे.)

******